आज़ादी का अमृत महोत्सव

जल बिरादरी

महाराष्ट्र शासन

# आझादी का अमृत महोत्सव

अंतर्गत

## चला जाणूया नदीला

## महाराष्ट्रातील ७५

# ‘नद्यांची यात्रा’

## नदीचे नांव: वेरळा नदी

VERALA DEVELOPMENT SOCIETY

जीवन वेद

## वेरळा विकास संस्था


SANGLI
(Maharashtra)
SATARA
SOLAPUR
KOLHAPUR
Karnataka
N
Dighanchi
Atpadi
Nagewadi
Kharasundi
Hanmant Vadiye
Khanapur
Vite
To Musur
To Karad
Kadegaon
Kundal
Visapur
Nagaj
To Sangole
Huljanti
Umadi
Karajagi
Krishna
Kasegaon
Arla
Borgaon
Nerla
Palus
Sawlaj
Islampur
Peth
Shirala
Valva
Tasgaon
Manerajuri
Kavathe Mahankal
Ankle
Jath
Kameri
Adumbar
Ashta
Bhilavdi
Bhose
Ranjini
Bilur
Bagni
Kavathe Piran
Bhudgaon
Gundewadi
Malgaon
Dudhgaon
SANGLI
Miraj
Arag
Bedag
To Kolhapur
(District Headquarter)
To Shedbal(Karnataka)
District Boundary
River
National Highway
Major Road
Road
Railway Track
District Headquarter
Taluk Headquarter
Town
Tourist Places

येरळा नदी

## येरळा नदी – सांगली जिल्हा प्रवेश चिखलहोळ

## येरळा विकास संस्था



**येरळा नदी प्राचीन काळी वेदावती या नावाने ओळखली जात असे.**

१. **थोडक्यात इतिहास** – येरळा नदीचा उगम, सातारा जिल्ह्यामध्ये मंजेवाडी गावाजवळील, महादेव गडाच्या टेकडयांमध्ये होतो. पश्चिम घाटातील टेकडयांची निर्मिती क्रॅटशियस इकॉसीन कालखंडामध्ये, १४५ ते ६६ दशलक्ष वर्षांपूर्वी झाली आहे. या टेकड्यांमध्ये वेगवेगळ्या झऱ्यांमधून नदीची निर्मिती झाली आहे.

२. **उगम** – सातारा जिल्ह्यांमध्ये खटाव तालुक्याच्या उत्तरेस, महादेव गडाच्या टेकड्यांमध्ये येरळा नदीचा उगम होतो. तेथून ती, वर्धनगड, व महिमान गडच्या मधून वाहते. या नदीवर सातारा जिल्ह्यामध्ये येरळवाडी धरण आहे. येरळा नदी पुढे सांगली जिह्यातील चिळलहोळ या गावी येते. पुढे जाऊन मिरज तालुक्यातील ब्रम्हनाळ येथे कृष्णा नदीला मिळते. येरळा नदीची एकूण लांबी १२४ कि.मी. आहे.

३. **कोणत्या नदीची उपनदी** – कृष्णा

# येरळा नदीच्या उपनद्या



**अ) नांदणी नदी** – नांदणी नदी येरळा नदीची उपनदी आहे. नांदणी नदी औंधजवळ सातारा जिह्यातील खटाव तालुक्यामधून वाहते, आणि कडेगांव तालुक्याच्या पूर्वेस, येरळा नदीला उजव्या बाजूने संगम पावते.

**ब) कर्पुर नादी** – खानापूर तालुक्यांच्या पश्चिमेस, कर्पुर नदी उगम पावते. ही नदी खानापूर तालुक्यामधूनच वाहते. तासगांवच्या पश्चिमेस कर्पुर नदी डाव्या बाजूने येरळा नदीस संगम पावते.

**क) चाँद नदी** – चाँद नदी, येरळा नदीची सर्वात लहान उपनदी आहे. खटाव तालुक्यातील पाचवड गावाच्या डोंगराळ भागात ही नदी उगम पावते, तसेच खटाव आणि खानापूर तालुक्यामधून वाहते व उजव्या बाजूने येरळा नदी बरोबर संगम पावते.

**ड) सोनहिरा ओढा –** कमळभैरव गडाच्या उत्तरेकडून सोनहिरा ओढा वाहत येतो, व येरळा नदी बरोबर संगम पावतो.

**येरळा नदी चे खोरे हा कृष्णा नदी खोऱ्याचा भाग आहे. येरळा नदी खोरे एकूण सहा तालुक्यांमध्ये आहे.**

१. खटाव, जि. सातारा
२. खानापूर, जि. सांगली
३. पलूस, जि. सांगली
४. कडेगांव, जि. सांगली
५. तासगांव, जि. सांगली
६. मिरज, जि. सांगली

**पाऊस –** येरळा नदी खोऱ्यामध्ये पश्चिमेपासून पूर्वेकडे पाऊसमान कमी आहे. तसेच हा पर्जन्यछायेचा प्रदेश आहे. मिरज, तासगांव, पलूस आणि खानापूर तालुक्यामध्ये पाऊसमान चांगले असते. तर कडेगांव आणि खटाव तालुक्यात पाऊसमान कमी आहे.

## तालुक्यामधील पाऊस खालीलप्रमाणे –

| अ.नु. | तालुक | सरासरी पाऊस | | प्रत्येक्ष पाऊस | |
|---|---|---|---|---|---|
| | | दिवस | मि.मि. | दिवस | मि.मि. |
| १ | पलूस | २२ | ५९७ | ७५ | ४४४ |
| २ | कडेगांव | ३० | ४५९ | ४१ | ४८५ |
| ३ | खानापूर | २९ | ५८१ | ८७ | ६०४ |
| ४ | तासगांव | २७ | ५९७ | ९२ | ४४४ |
| ५ | खटाव | २५ | ४१५ | ९३ | ५७४ |
| | **सरासरी** | **२६** | **५३०** | **७७** | **५१०** |

येरळा नदी खोऱ्यामध्ये जून ते सप्टेंबर पाऊस पडतो. तसेच ऑगस्ट – सप्टेंबर महिन्यात प्रामुख्याने पाऊस पडतो. येथील सरासरी पाऊस ५३० मि.मि. आहे. तसेच नोव्हेंबर ते जानेवारी या थंडीच्या कालखंडामध्ये तापमान १३$^{0}$C ते २९$^{0}$C असते. तर मार्च ते मे या उष्ण हवामानाच्या कालखंडामध्ये तापमान २२$^{0}$C ते ४०$^{0}$C असते.

**वने** – २०००० हेक्टर खोरे वनच्छादित आहे. म्हणजेच एकूण येरळा नदी खोऱ्यापैकी १५ टक्के भूभाग वनाने व्यापला आहे. वनांचा प्रकार – काटेरी झुडुपे व मोठे वृक्ष असा आहे. बाभूळ, तरवड, नीम्ब, चिंच, जांभूळ, आंबा असे वृक्ष येथे आढळतात.

## वनांचे तालुक्या अनुरूप वर्गीकरण या प्रमाणे

| अ नु. | तालुका | वनक्षेत्र |
|---|---|---|
| १ | पलूस | ९८६ हेक्टर |
| २ | कडेगांव | ४७४२ हेक्टर |
| ३ | खानापूर | ६१९४ हेक्टर |
| ४ | तासगांव | ३९७८ |
| ५ | खटाव | ४१२१ हेक्टर |
| | एकूण | २००१८ हेक्टर |

## लोकसंख्या

येरळा नदी खोऱ्यामधील लोकसंख्या अंदाजे ११,३०,००० इतकी आहे. तासगांव ते खटाव तालुक्यात लोकसंख्येची घनता इतर तालुक्यांच्या पेक्षा जास्ती आहे.

## येरळा नदी खोऱ्यामधील शेती

नदी खोऱ्यामधील लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. खोऱ्यातील आरफळ, टेंभू आणि ताकारी या तीन पाणी योजनांमुळे या भागामधील शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारले आहे. खरीप आणि रब्बी या दोन्ही प्रकारची पिके येथे होतात. ज्वारी, बाजरी, भुईमूग, सोयाबीन, नाचणी, फळभाज्या, कापूस हळद, आले इ. पिके खरीपांची तर हरभरा, गहू ही रब्बीची पिके घेतली जातात. मात्र ऊस आणि द्राक्षे ही नगदी पिके जास्ती प्रमाणात घेतली जातात.

लहरी हवामान, अवेळी पडणार पाऊस तसेच पावसाचे कमी अधिक प्रमाण यामुळे येथील शेतकरी सध्या ऊसाचे पीक घेण्यास प्राधान्य देत आहे.

## येरळा नदी खोरे

३०२९ स्वे.कि.मी.



## नदीकाठची गावे

जि. सातारा – वाकेश्वर, वडूज, गणेशवाडी, येरळवाडी.

जि.सांगली – चिळलहोळ, चिळली, गुंडेवाडी, कान्हरवाडी, हिंगणगादे, हणमंत वडीये, अंबेगाव, वडीये रायबाग, कमळापूर, रामापूर, बलवडी, तांदळगाव, वाझर, आंधळी, मोराळे, राजापूर, तुरची, निमणी, नांद्रे, वसगडे, ब्रम्हनाळ.

# येरळा नदी जुलै महिन्यातील स्थिती







## नदी खोऱ्यातील शेती व शेती पूरक व्यवसाय

**येरळा नदी खोरे** – खानापूर, कडेगांव, तासगांव, आणि पलूस तालुक्यामध्ये विभागले गेले आहे. खोऱ्यातील ७०% लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. कुक्कुट पालन, पशुपालन (गाई, म्हैशी) इ. पूरक व्यवसाय काही प्रमाणात आहेत. सांगली जिल्हयामधील ६४९००० हेक्टर जमीन लागवडखाली आहे. जिल्हयामधील प्रमुख नदी कृष्णा असून, आपण अभ्यास करीत असलेली येरळा नदी कृष्णा नदीची उपनदी आहे. येरळा नदी खोऱ्यामध्ये टेंभू, ताकारी व आरफळ या तीनही योजनांमुळे कृष्णानदीचे पाणी फिरवले गेले आहे. येरळा नदी खोरे त्यामुळे कृष्णानदी खोऱ्याचाच एक भाग आहे.

## नदीच्या जमिनीवरील अतिक्रमण हंगामी / कायम इ.

**नदीपात्रातील विहिरी** – ८०

ज्या जलकुंभावर पूर्णपणे किंवा अंषत: अतिक्रमण झाले आहे. त्यांची यादी आणि अतिक्रमणाचे स्वरूप

**अ**. शेतजमिनीचे अतिक्रमणे आहे. **ब.** इतर अतिक्रमण – विहिर

## प्रदूषण

सांडपाणी आणि प्रदूषण यावर उपाय व तांत्रिक सूचना.

## सांडपाणी निचरा व्यवस्था

**चिखलहोळ –** गावाचे सांडपाणी ओढ्याला जाते व तेथून पुढे नदीला जाते.

**कमळापूर –** सांडपाण्यासाठी गटारे आहेत. शोष खड्डा आहे. सांडपाणी नदीला जात नाही.

**वाझर –** दोन गटारे आहेत. गटारे शोष खड्डयाला जोडली आहेत. सांडपाणी नदीला जात नाही.

**हणमंत वडीये –** सांडपाण्यासाठी गटारे आहेत. शोष खड्डा आहे. सांडपाणी नदीला जात नाही.

**वडीयेरायबाग –** सांडपाण्यासाठी गटारे आहेत. शोष खड्डा आहे. सांडपाणी नदीला जात नाही.

**मोराळे –** सांडपाणी वाहून जाण्यासाठी गटारीचे काम सुरू आहे. शोष खड्डा बांधून तयार आहे. सध्या सांडपाणी गावाच्या परिसरामध्ये जाते.

**रामापूर –** चार गटार आहेत. त्यातून सांडपाणी नदीमध्ये जाते.

**तुरची –** सांडपाण्याकरीता गटार आहे. सांडपाणी वाहून नदीला जाते. शासनाकडे सांडपाण्यासाठी प्रस्ताव दिला आहे.

## इतर प्रदूषण व त्यावरील उपाय

**मोराळे –** ग्रामपंचायत प्लास्टिक कचरा गावकऱ्यांकडून विकत घेते. सदरचा प्लास्टिक कचरा प्रक्रियेकरीता दिला जातो.

**तुरची –** गावाने नदीमध्ये अस्थी विर्सजन न करण्याचा निर्णय घेतला आहे. अस्थी विसर्जन जमिनीवर करून तेथे झाडे लावण्यात येतात.

**इतर गावांमध्ये घटांगाडी आहे. कचरा गोळा करून गावाबाहेर टाकण्यात येतो. त्यांचे पुढील कोणतेही व्यवस्थापन होत नाही.**



## नदी खोऱ्यातील जलस्त्रोत

नदी यात्रा केलेल्या नऊ गावांमधील जलस्त्रोत याप्रमाणे आहेत

| | | |
|---|---|---|
| चिखलहोळ | दगडी बंधारे | १२ |
| | के.टी. वेअर | २ |
| कमळापूर | पाझर तलाव | १ |
| | सिमेंट बांध | २ |
| | के. टी. वेअर | १ |
| रामापूर | के. टी. वेअर | १ |
| | साठवण तलाव | १ |
| | शेततळे | २० |
| वाझर | सिमेंट बांध (ओढ्यावर) | ४ |
| | के. टी. वेअर (२ टप्पे) | १ |
| हणमंत वडीये | के. टी. वेअर | २ |
| | साठवण तलाव | २ |
| | सिमेंट बांध | ४ |

| | | |
|---|---|---|
| वडीये रायबाग | के. टी. वेअर | १ |
| | सिमेंट बांध | ४ |
| | तलाव | १ |
| | शेततळे | १ |
| मोराळे | लहान बंधारे (सिमेंट) | ११ |
| | पाझर तलाव | २ |
| | माती बंधारे | ५ |
| | के. टी. वेअर | १ |
| तुरची | पाझर तलाव | १ |
| | माती बांध (ओढ्यावर) | ५ |
| | शेततळे | ३५ |

## येरळा नदी वडियारायबाग केटिवेअरची स्थिती



## तुपेवाडी – जुलै महिन्यातील नदी पात्र व नदी पात्रातील विहीर



# मोराळे निमणी बंधारा गेट दुरूस्ती करणे व नदी पात्र स्वच्छ करणे गरजेचे







## नदी यात्रे दरम्यान लोकांशी संवाद साधताना मिळालेली माहिती, निरिक्षणे आणि सुचना

१. येरळा नदीची ओळख, भरपूर वाळू साठा करणारी नदी अशी आहे. गावांमधील जागरूक नागरीक बेकायदेशीर वाळू उपसा करणाऱ्यांना पायबंद घालतात. (नदीवरील रस्त्यावर चर खणणे, वाळूचे ट्रक अडवणे इ.) तरीही काही प्रमाणात वाळू उपसा सुरू आहे. नदीमध्ये पाणी नसले तरीही, वाळूच्या थराखाली चांगला पाणी साठा आहे. बेकायदेशीर वाळू उपसा करणेस पायबंद घालणे गरजेचे आहे.

२. अवेळी व विषम प्रमाणात पडणाऱ्या पावसामुळे, हवामनामधील बदलामुळे सध्या शेतकऱ्यांचा कल ऊसाचे पिक घेण्याकडे होत आहे. उसाला लागणाऱ्या पाण्याचा विचार केला तर भविष्यातील पाण्याचे नियोजन कोलमडण्याचा धोका आहे. तसेच उसाच्या पिकाकरीता वापरली जाणारी रासायनिक खते, जमीन आणि पाणी याचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात करतात. या सर्वांचा विचार होणे गरजेचे आहे.




नदी प्रदूषण – महिलांच्या विविध गटांशी संवाद




नदी प्रदूषण –प्लास्टिक कचरा विलगीकरण, शालेय शिक्षकांशी संवाद

३. तसेच वरील सर्व गावांमध्ये दुष्काळाचा कालखंडात जनावरांकरीता चारा छावण्या निर्माण करण्यात आल्या होत्या. त्याऐवजी गायरान जमिनीमध्ये, नदी काठावर शेतीचे अतिक्रमण काढून, तेथे जनावरांसाठी गवताचे उत्पादन घेतल्यास जनावरांकरीता उपयोगी ठरेल

४. नदी आणि ओढे त्यांच्या नैसर्गिक प्रवाहामध्ये वाहण्यासाठी योग्य करणे.

५. नदी आणि ओढे यांचे प्रदुषण थांबवणे.

६. कोल्हापूर टाईप बंधाऱ्याची दुरूस्ती करणे. त्यांच्या वार्षिक देखभालीची जबाबदारी निश्चित करणे – ग्रामपंचायतीस जबाबदारी देणे.

७. जमिनीची धूप होवू नये म्हणून नदीकाठी बांबू लागवड करण्यास प्रोत्साहन देणे.

८. येरळा नदी बारमाही वाहणारी नदी नाही. ऑगस्ट – सप्टेंबरमध्ये नदीला पाणी असते. वडियेरायबाग–निमणी–तुरची या परिसरामध्ये नदीमध्ये २.५ मिटर उंचीचे लहान बांध घातल्यास, बांधाच्या मागे १०० मिटर पर्यंत पाणी साठू शकते. तसेच २ ते २.५ मिटर उंचीचा बांध असल्याने गाळ साठणार नाही.

९. तसेच काही गावांमधील प्रायोगिक तत्वावर सुरू असणारे शेतीसाठी व जैव विविधतेसाठीचे चांगले उपक्रम इतर गावांमध्ये स्विकारले गेल्यास फायदेशीर ठरू शकते.

उदा –

**अ) गावाचे नाव – हणमंत वडीये**

शेतकरी – श्री रघुनाथ पिसाळ, सेंद्रीय अळगणी, फवारणी व कीटक नाशक तयार करणे
फोन नं. ९८८११०२८८३

**ब) गावाचे नाव – वडियेरायबाग**

गटाचे नाव – हरीत क्रांती सेंद्रीय शेती गट

**क) गावाचे नाव – तुरची**

शेतकरी – श्री. विजय गलांडे, श्री प्रदीप तांदळ
फोन नं. ९८९०४५१४५५, ९०९६४२१०१६

**ड) गावाचे नाव – मोराळे**

**जैव विविधता –** नीवर मच्छीपालन केंद्र केले आहे. तेथे मरळ आणि वाम जातीचे मासे उत्पादन केले जाते. त्याचे उत्पन्न ग्रामपंचायतीस मिळत आहे.

**१०.** वडीयेरायबाग – निमणी – तुरची येथील नदी क्षेत्रात तज्ञांव्दारे पाहणी केली आहे. नदीपात्राची रूंदी या गावात ३०० ते ५०० फूट आहे. तेथे दगडी काठ आहे. त्या ठिकाणी सिमेंट बांध घालता येवू शकतो.

वरील उपाययोजना केल्यास, येरळा नदी बारमाही वाहणारी नी होवू शकते. तसेच बदलत्या आणि लहरी हवामानमध्ये देखील शेतीतून चांगले उत्पादन घेणे, पिण्यासाठी व जनावरांसाठी पाण्याची पुरेशी उपलब्धता असणे आणि शेत जमिनीची सुपिकता टिकवणे हे सर्व साध्य होवू शकते.

# येरळा नदी खोऱ्यामधील सेंद्रिय शेतीचे प्रयोग – हणमंतवडीये








# नदीला येऊन मिळणारे ओढे त्यावरील बंधाऱ्यांचे स्थिती उत्तम परंतु गाळ व वनस्पती इत्यादीमुळे पाणी साठण्याचे प्रमाण कमी







## तुरची



## राजापूर



## महत्वाचे निष्कर्ष



**चिळलहोळ ते ब्रम्हनाळ** – (वेरळा नदीचा सांगली जिल्ह्यातील प्रवेश ते वेरळा नदीचा कृष्णा नदीशी संगम) असे प्रत्यक्ष भेट व ड्रोन कॅमेऱ्याव्दारे चित्रीकरण करण्यात आले. त्यामध्ये काही निष्कर्ष निझाले आहेत. ते याप्रमाणे –

१. वेरळा नदी दुष्काळी भागातील नदी आहे.

२. ऑगस्ट महिन्यातील पावसाने या नदीला पाणी येते.

३. कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांची स्थिती

अ) बंधाऱ्यांच्या दारांमधून पाणी वाहून जात आहे.

ब) काही ठिकाणी दारे अस्तित्वात नाहीत.

४. बलवडी धरण १८५६ – तीन दरवाजे तयार केले आहेत, परंतु त्यास दार बसवली नाहीत. भक्कम व सुस्थितीत असणाऱ्या धरणात पाणी साठा होत नाही. त्या ठिकाणी दरवाजे नाहीत. मात्र या धरणाचे व्हॉल्व आणि तासगांव शहरापर्यंत पाणी घेऊन जाण्याचा कालवा सुस्थितीत आहे. काही प्रमाणात डागडुजी करून ही योजना कार्यान्वित होवू शकते.

५. **वेरळा नदीला येऊन मिळणाऱ्या ओढ्यांची स्थिती** – आळसंद ओढा, सोनहिरा ओढा, निलकी ओढा, माहुली ओढा यांचे चित्रीकरण केले. यामध्ये वृक्ष, वेली आणि पाणवनस्पती यांची जास्ती प्रमाणात वाढ झाली असल्याने, गाळ साठलेला असल्या कारणाने ओढ्यांमधून नुदी पात्रात पाणी प्रवाहित होत नाही आहे.

६. वडियेरायबाग पासून नदी कोरडी होत आहे. नदी दुष्काळी, खडकाळ भागातून प्रवाहित होत असल्याने, नदीमध्ये वाळूच्या साठ्याचे प्रमाण अधिक आहे. याच वाळूच्या साठ्याचा उपयोग करून (गौण खनिज) नदीमध्ये ३ ते ४ मिटर उंचीचे बंधारे बांधल्यास नदीमध्ये पाणी साठा होवू शकतो.

**प्राथमिक स्तरावर आम्हाला – वेरळा विकास संस्थेला वडियेरायबाग ते शिवणी गावा दरम्यान एक बंधारा (उंची ३ ते ४ मिटर) बांधण्यासाठी प्रकल्प मंजूर करावा. वेरळा संस्थेच्या पूर्व कामाचा अनुभव आणि निष्पत्ती या दोन्हीचा येथे विचार व्हावा व एक मॉडेल बंधारा बांधून घ्यावा.**

**त्यातून मिळणाऱ्या रिझल्टनंतर – पाणी साठा पाहून, आपणास अशा प्रकारचे साखळी बंधारे बांधता येतील.**

बळीराजा बंधारा व वाझर बंधारा साखळी पध्दतीने काम करतात, त्यामुळे तेथे पाणी साठी मोठ्या प्रमाणात होत आहे, हे आपणास दिसून येते.

स्थापत्य अभियांत्रिकी (पदविका विभाग) वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अभियंत्यांनी येवलेवाडी बंधारा ते हणमंत वडीये बंधारा येथे सर्वेक्षण केले आहे. सदरचे बांधारे येथे बांधता येवू शकतात, असा त्या सर्वेक्षणाचा निष्कर्ष आहे.

# येरळा नदी – १९५६ मधील बंधारा, वॉल्व, तासगांव शहरात पाणी पुरवण्यासाठी कॅनॉल







# ३ ते ४ मिटर उंचीच्या बंधाऱ्याची आवश्यकता वडियेरायबाग ते निमणी



## बलवडी बंधारा व वाझर बंधारा के. टी. वेअर साखळी पध्दतीने कार्यरत असल्याने पाण्याचा पुरेसा साठा







# वेरळा व कृष्णा संगम – ब्रम्हनाळ

वेरळा विकास संस्था



# Walchand College of Engineering

(Government-Aided Autonomous Institute)

Vishrambag, SANGLI - 416415 (M.S.) India

Website : www.walchandsangli.ac.in

Estd : 1947

Email : wce@walchandsangli.ac.in, director@walchandsangli.ac.in

Director - +91-233-2300430 Office - +91-233-2303116 Fax +91-233-2300831


संदर्भ : पॉलिटेक्निक विभाग/स्थापत्य/सल्लागार/ वडीयेरायबाग/ 270

दिनांक: १४/०९/२०२३

प्रति,
मा. सरपंच
ग्रामपंचायत,.
ता. कडेगाव जि. सांगली

विषय : येरळा नदीवरील येवलेवाडी बंधारा ते हणमंतवाडी बंधारापर्यंत प्रस्तावित बंधाऱ्याच्या जागेचा सर्वेक्षणअहवाल

संदर्भ : दिनांक १४.०७.२०२३ रोजीचे सरपंच, ग्रामपंचायत, वडीयेरायबाग यांचे पत्र

मा. महोदय,

वर उल्लेख केलेल्या विषय व संदर्भानुसार स्थापत्य अभियांत्रिकी पदविका विभागातील प्रा नितीन कांबळे व प्रा सुनील चिकुर्डे यांनी दि. ०५.०८.२०२३ रोजी येरळा नदीवरील येवलेवाडी बंधारा ते हणमंतवाडीये बंधारा पर्यंत प्रस्तावित बंधाऱ्याच्या जागेकरिता सर्वेक्षण केले आहे.

सदर सर्वेक्षणाच्या वेळी सर्वश्री संपतराव पवार, विलासराव चौधाई, सौ मनीषा कांबळे (सरपंच), आश्विक जाधव (उपसरपंच), विशाल कांबळे, शैलेंद्र पाटील, प्रदिप जगताप, सतीश जगताप, प्रशांत मोहिते, संतोष शिंदे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

- सदर प्रस्तावित बंधाऱ्याचे काम करणेचे ठरलेस, त्याची रितसर शासकिय तांत्रिक मंजुरी पाटबंधारे विभाग/जिल्हा परिषद सांगली यांचेकडून घेणेत यावी.
- सोबत जोडलेलासर्वेक्षण अहवाल स्थापत्य अभियांत्रिकी (पदविका विभाग), वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली यांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून विना मोबदला केलेला आहे.
- Please Note –The information given in the report is true and correct to the best of our knowledge. The college is responsible only for the technical aspects of the work carried out under the scope of the request of the client. The college or its representative facultywill not be party to the legal implications arising out of the use of this report in any manner. **Subject to Sangli jurisdiction.

कळावे. आभारी आहे.

१४/०९/२३


प्रा हर्षद कुलकर्णी
विभाग प्रमुख (स्थापत्य)

प्रा अशोक कांबळे
प्र. उप-प्राचार्य (पदविका)
उप प्राचार्य,
वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय,




## येरळा नदीवरील येवलेवाडी बंधारा ते हणमंतवाडी बंधारापर्यंत प्रस्तावित बंधाऱ्याच्या जागेचा सर्वेक्षण अहवाल

स्थापत्य अभियांत्रिकी पदविका विभागातील प्रा नितीन कांबळे व प्रा सुनील चिकुर्डे यांनी दि. ०५.०८.२०२३ रोजी येरळा नदीवरील येवलेवाडी बंधारा ते हणमंतवाडीये बंधारा पर्यंत प्रस्तावित बंधाऱ्याच्या जागेकरिता सर्वेक्षण केले आहे.



प्रा नितीन कांबळे व प्रा सुनील चिकुर्डे यांनी प्रस्तावित बंधाऱ्याच्या जागेकरिता सर्वेक्षण केले



सदर सर्वेक्षणाच्या वेळी सर्वश्री संपतराव पवार, विलासराव चौधाई, सौ मनीषा कांबळे (सरपंच), आश्विक जाधव (उपसरपंच), विशाल कांबळे, शैलेंद्र पाटील व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.


- येरळा नदीवरील येवलेवाडी बंधारा ते हणमंतवाडीये बंधारा यामधील अंतर अंदाजे २.५ कि.मी. आहे
- येवलेवाडी बंधारा पासून १.३ कि.मी. अंतरावर शिवनी-वडीयेरायबाग पूल आहे.



**येरळा नदीवरील येवलेवाडी बंधारा ते हणमंतवाडी बंधारा पर्यंत प्रस्तावित बंधाऱ्याच्याजागेचा नकाशा (Google Image)**

- सदरचे सर्वेक्षण करताना येरला नदी पात्रात प्रचंड प्रमाणात वाळू असलेचे आढळले आहे व सदरच्या L-Section मध्ये दाखवलेल्या Levels या वाळूच्या Levels आहेत त्या Bed Levels नाहीत.
- येवलेवाडी बंधारा Sill Level Bench Mark १००.०० मी. घेतला आहे.
- येवलेवाडी बंधारा येथील FSL१०३.४३ मी. आहे
- हणमंतवाडीये बंधारा येथील FSL ९९.४७ मी. आहे
- सोबत येवलेवाडी बंधारा ते हणमंतवाडीये बंधारा दरम्यानचा L-Section जोडला आहे.





**येरळा नदीवरील येवलेवाडी बंधारा ते हणमंतवाडी बंधारा पर्यंतचा L-Section**

- सोबत जोडलेल्या L-Section प्रमाणे प्रस्तावित बंधाऱ्याची जागा शिवनी-वडीयेरायबाग पूलापासून U/S २०० मीटरवर करणेस तांत्रिकदृष्ट्या योग्य वाटते.
- सदर प्रस्तावित बंधाऱ्याचे काम करणेचे ठरलेस, त्याची रितसर शासकिय तांत्रिक मंजुरी पाटबंधारे विभाग/जिल्हा परिषद सांगली यांचेकडून घेणेत यावी.
- सदर सर्वेक्षण अहवाल स्थापत्य अभियांत्रिकी (पदविका विभाग),वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली यांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून विना मोबदला केलेला आहे.
- Please Note –The information given in the report is true and correct to the best of our knowledge. The college is responsible only for the technical aspects of the work carried out under the scope of the request of the client. The college or its representative facultywill not be party to the legal implications arising out of the use of this report in any manner. **Subject to Sangli jurisdiction.

स्थळ : सांगली.
दिनांक : १४/०९/२०२२

प्रा नितीनकांबळे. प्रा सुनीलचिकुर्डे
स्थापत्य अभियांत्रिकी पदविका विभाग
वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली

## वेरळा विकास संस्था

# धन्यवाद!